सकाळ

# 'रवळनाथ'ला एक कोटी ८७ लाख नफा

## एम. एल. चौगुले; कोरोनातही कामगिरीचा वाढता आलेख

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. ५ : श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीला सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात १ कोटी ८७ लाखांचा निव्वळ नफा झाला आहे. कोरोनाच्या सावटाखालील या वर्षातही संस्थेच्या सर्वोत्तम कामगिरीचा वाढता आलेख कायम राहिला आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

'चौगुले म्हणाले, ३१ मार्च अखेर सभासद संख्या ९२३६ इतकी आहे. एकूण ३४२ कोटीच्या ठेवी, तर २४५ कोटींची कर्जे आहेत. खेळते भांडवल ३७८ कोटींचे असून एकूण गुंतवणूक ११५ कोटींची आहेत. संस्थेने ५८७ कोटी इतका वार्षिक व्यवसाय केला आहे. रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या संस्थेची स्वत:ची वेबसाईट असून त्यावरुन वार्षिक अहवालासह ताज्या घडामोडींची माहिती दिली जाते. सध्या मोबाईल बँकींग, सीबीएस, मायक्रो एटीएम, डेबीट कार्डद्वारे डिजीटल सेवा दिली जाते. तसेच आरटीजीएस व एनईएफटी, लॉकर, वीज बिल भरणा केंद्र, पेन्शनधारक व ज्येष्ठ नागरिकांच्या सोयीसाठी नॅशनल ॲटोमेटेड क्लिअरिंग हाऊस (नॅच) या सेवांसह गंभीर आजारी व वयोवृद्ध ग्राहकांना घरपोच सेवा सुरू आहे.



एम. एल. चौगुले

संस्थेला स्वतंत्र आयएफएससी कोड प्राप्त झाला आहे. संस्थेच्या प्रधान कार्यालयाची सुसज्ज इमारत गडहिंग्लजला स्वमालकीच्या जागेत आहे. नऊ पैकी गडहिंग्लज, कोल्हापूर, जयसिंगपूर, कुडाळ या शाखाही स्वत:च्या इमारतीत कार्यरत आहेत. लवकरच सोने तारण व गहोपयोगी उपकरणे खरेदी कर्ज सुविधा सुरु करीत असून शैक्षणिक कर्जाची मर्यादा २५ ऐवजी ५० लाखापर्यंत वाढविण्यात आली आहे. संस्थेच्या प्रगतीसाठी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, सर्व संचालक, सर्व शाखाध्यक्ष, सल्लागार, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, व्यवस्थापक शिवानंद घुगरे, सर्व शाखाधिकारी, कर्मचारी यांच्यासह सभासद, ठेवीदार, कर्जदार व ग्राहकांचे सहकार्य मिळत आहे.''

Kolhapur, Gadhinglaj-Today
06/04/2022 Page No. 4